ePaper
# होय, मी भटकती आत्मा, जनतेसाठी शंभरवेळा अस्वस्थ राहीन : शरद पवार




|| वर्ष - 7 । अंक - 343 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दि. 1 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**
- टी-20 वर्ल्डकपसाठी भारतीय संघ जाहीर
- योगगुरू रामदेवबाबा यांना धक्का
- शिवसेना शिंदे गटाला मिळाली आणखी एक जागा?

## भोसरीत अ‍ॅन्टी करप्शन पथकाची कारवाई
# लाच प्रकरणी अभियंता जाळ्यात!
### महावितरण प्रशासनामध्ये खळबळ : विद्युत भार वाढवण्यासाठी मागितले 50 हजार

**।पिंपरी। महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

**महावितरणच्या भोसरी कार्यालयातील सहायक अभियंत्याला 45 हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. ही कारवाई मंगळवारी (दि. 30) करण्यात आली. वर्षभरापूर्वी एका अधिकाऱ्याला लाच प्रकरणी रंगेहाथ पकडले होते. त्यानंतर याच पदावर नवीन अधिकाऱ्याची नियुक्त करण्यात आली. आता पुन्हा तोच प्रकार घडल्यामुळे महावितरण प्रशासनाला लाचखोरीची कीड लागली आहे का? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.**

किरण गजेंद्र मोरे (वय 33) असे अटक केलेल्या सहायक अभियंत्याचे (वर्ग-2) नाव आहे. याप्रकरणी 47 वर्षीय व्यक्तिने एसीबीकडे तक्रार केली आहे.

एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे फ्रेंड इलेक्ट्रोनिक्स कंपनीचे सर्व कामकाज पाहतात. कंपनीला सन राईस कंपनीचे विद्युत भार वाढविण्याचे काम मिळाले होते. विद्युत भार वाढविण्यासाठी तक्रारदार यांनी महावितरणच्या कार्यालयात अर्ज केला होता. त्या अर्जावर पुढील कार्यवाही करण्यासाठी अर्ज किरण मोरे यांच्याकडे आला होता.

हे काम करून देण्यासाठी त्यांनी 50 हजार रुपयांची लाच मागितली. दरम्यान तक्रारदार यांनी एसीबीकडे तक्रार केली. एसीबीने मंगळवारी सापळा लावला. तडजोड करून किरण मोरे याने 45 हजारांची लाच घेतली.

लाच घेताना एसीबीने त्याला रंगेहाथ पकडले. याबाबत एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एसीबीचे पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करीत आहेत.

दरम्यान, या कारवाईमुळे दिवसभर महावितरण प्रशासनाच्या वर्तुळात चर्चा रंगली होती.

> **“महावितरण प्रशासन किंवा महापालिका प्रशासन असो लाचखोरीचे प्रमाण वाढले आहे. अनेकदा सर्वसामान्य नागरिक भीतीपोटी अ‍ॅन्टी करप्शनकडे तक्रार करीत नाहीत. महापालिका प्रशासनामध्ये तर प्रशासकीय राजवट सुरू असल्यामुळे अधिकाऱ्यांचे फावले आहे. कोणतेही काम आर्थिक लाभ घेतल्याशिवाय पूर्ण होत नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची अक्षरशः लूट सुरू आहे.”**
> **- तुषार कामठे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी शरद पवार पक्ष**

# कर्तव्यदक्ष चार पोलिसांचा सन्मान!
### महासंचालकांचे सन्मानचिन्ह जाहीर : महाराष्ट्र दिनी होणार गौरव

**।पिंपरी। महाईन्यूज। ।प्रतिनिधी ।**

**राज्य पोलीस दलात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तसेच ( CHINCHWAD) गुणवत्तापूर्ण सेवा बजावणाऱ्या 800 जणांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील चार कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.**

दरवर्षी 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी दरम्यान देशभरातील सुरक्षा यंत्रणेत कार्यरत असलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती शौर्य पदक (पीएमजी), पोलीस शौर्य पदक (जीएम), राष्ट्रपती पदक (पीएसएम) अशी पदके जाहीर केली जातात. या पदकांसाठी प्रत्येक राज्यातील घटकांमधून शिफारशी सादर केल्या जातात. त्याचप्रमाणे राज्यात देखील पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र जाहीर केले जाते.

महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय पोलीस सेवेतील 6 अधिकारी, पोलीस उपायुक्त ते सहायक आयुक्त दर्जाच्या 31 अधिकाऱ्यांसह 800 पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना सन 2023 सालचे पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र जाहीर झाले आहे. याबाबत पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी आदेश दिले आहेत.

मुंबई शहरचे पोलीस उपमहानिरीक्षक परमजीत दहिया, महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील पोलीस उप महानिरीक्षक निवा जैन, मुंबई शहरच्या पोलीस उपायुक्त तेजस्वी सातपुते, गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक निलोत्पल, गडचिरोलीचे अपर पोलीस अधीक्षक कुमार चिंता, यतीश विजयराव देशमुख या भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे.

राज्य पोलीस सेवेतील सहायक आयुक्त ते उपायुक्त दर्जाचे 31 अधिकारी, 54 पोलीस निरीक्षक, 24 सहायक निरीक्षक, 49 उपनिरीक्षक, 140 सहायक उपनिरीक्षक, 333 पोलीस हवालदार, 51 पोलीस नाईक, 108 पोलीस शिपाई यांना हे सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे.


पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील सहायक पोलीस उपनिरीक्षक बंडू मारणे, पोलीस हवालदार चंद्रधर कोंडे, पोलीस हवालदार सचिन चव्हाण, पोलीस हवालदार हनुमंत कांबळे यांचा यामध्ये समावेश आहे.

# घरभाडे वाढता वाढता वाढे..!

## भाडेकरूंना टेन्शन : हिंजवडी अन् वाघोली 'हॉट'

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या असलेल्या परिसरात घरभाड्यात सर्वाधिक वाढ होत आहे. हिंजवडी आणि वाघोलीत घरभाडे सर्वाधिक आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पहिल्या तिमाहीत हिंजवडीत ४ टक्के आणि वाघोलीत ७ टक्के घरभाडे वाढले आहे.**



| शहर – | भाग – | घरभाडे (रुपयांत) |
|---|---|---|
| बंगळुरू – | सर्जापूर रस्ता – | ३४ हजार |
| हैदराबाद – | हायटेक सिटी – | ३२ हजार ५०० |
| पुणे – | हिंजवडी – | २६ हजार ५०० |
| दिल्ली – | गोल्फ कोर्स रस्ता – | ४३ हजार |
| मुंबई – | चेंबूर – | ६२ हजार ५०० |
| कोलकता – | ईएम बायपास – | २७ हजार |
| चेन्नई – | पेराम्बूर – | २१ हजार |

अनारॉक ग्रुपने देशातील मालमत्ता क्षेत्राचा अहवाल जाहीर केला आहे. यात देशातील प्रमुख सात महानगरांचा आढावा घेण्यात आला आहे. त्यानुसार, पुण्यात हिंजवडी आणि वाघोलीत घरभाड्यात सर्वाधिक वाढ झाली आहे. हिंजवडीत २ बीएचके (१ हजार चौरस फूट) सदनिकेचे भाडे २०२२ च्या अखेरीस २१ हजार रुपये होते. ते २०२३ च्या अखेरीस २५ हजार ६०० रुपये आणि यंदा मार्चअखेरीस २६ हजार ५०० रुपयांवर पोहोचले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पहिल्या तिमाहीत घरभाडे ४ टक्क्यांनी वाढले आहे. वाघोलीत घरभाडे २०२२ च्या अखेरीस १७ हजार होते. ते २०२३ च्या अखेरीस २० हजार ६०० आणि यंदा मार्चअखेरीस २२ हजार रुपयांवर पोहोचले. गेल्या वर्षीच्या तुलनेत पहिल्या तिमाहीत घरभाडे ७ टक्क्यांनी वाढले आहे.

देशातील सात महानगरांचा विचार करता यंदा पहिल्या तिमाहीत सरासरी घरभाड्यात ४ ते ९ टक्के वाढ झाली आहे. घरभाड्यात वार्षिक ५ ते १० टक्के वाढ मोठी मानली जाते. साहजिकच त्याचा फायदा घरमालकांना होत असला तरी भाडेकरूंना त्याची आर्थिक झळ बसत आहे. देशात सर्वाधिक भाडेवाढ बंगळुरूत झाली आहे.

# पुण्यात मनसे लागली जोमाने कामाला!

## पंतप्रधान मोदींच्या सभेचा प्रभाव

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुढीपाडव्याला घेतलेल्या मेळाव्यात आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी राज्यात महायुतीला बिनशर्त पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले होते. राज ठाकरेंचे पुत्र अमित ठाकरे हे काल पुण्यात झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जाहीर सभेच्या व्यासपीठावर उपस्थित होते. त्यानंतर आता मनसेचे विविध नेते महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारात सहभागी होत असल्याचं दिसत आहे.**

आज पुण्यात मनसे निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी मनसेच्या कार्यकर्त्यांवर स्तुती सुमने उधळत मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी मेळाव्याच्या माध्यमातून संवाद साधला.

या वेळी बोलताना मोहळ म्हणाले की, आपल्या नेत्याप्रती किती विश्वास आणि श्रद्धा असावी? याचा वस्तुपाठ म्हणजे मनसेचा प्रत्येक घटक ! पार्टीच्या स्थापनेपासून तर आजतागायत संघर्ष करत मनसेचे नेते आणि कार्यकर्ते पार्टीसोबत राहिले. हे निश्चितच प्रेरणा देणारे आहे.

मेळाव्यास उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मनसेचे नेते राजेंद्र (बाबू) वागसकर, सरचिटणीस . किशोरभाऊ शिंदे, सरचिटणीस बाळाभाऊ शेडगे, सरचिटणीस श्री. गणेशअप्पा सातपुते, सरचिटणीस अजयजी शिंदे, सरचिटणीस रणजितजी शिरोळे, शहराध्यक्ष साईनाथजी बाबर आदी उपस्थित होते.

# मोदींच्या सभेमुळे आढळरावांची ताकद वाढली

## लोकसभा रणसंग्राम : शिरूरमध्ये 'घडाळ्याला मत म्हणजे मोदींना मत'चा नारा!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्रामध्ये जाहीर सभांचा झंझावात सुरू केला. पुण्यातील रेसकोर्स मैदानावर मोदींची ऐतिहासिक सभा झाली. यामुळे पुणे, शिरुर आणि मावळ यासह बारामती लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या उमेदवारांना फायदा होणार आहे.**



मोदी सरकारचे 'व्हीजन' आणि देशहिचे निर्णय यामुळे महायुतीचे पारडे जड झाले असून, शिरुरमध्ये शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचाराला गती मिळाली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित पवार गटाकडून 'घड्याळ' या चिन्हावर शिवाजीराव आढळराव पाटील निवडणूक लढवत आहेत.

शिरुर लोकसभा मतदार संघाचा विचार करता खेड, आंबेगाव, जुन्नर आणि हडपसर विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी अजित पवार यांच्या विचारांचे आमदार आहेत. त्यामुळे सहापैकी ४ मतदार संघात राष्ट्रवादीची ताकद वैयक्तिकरित्या मोठी आहे. तसेच, भोसरीमध्ये भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी तब्बल १ लाख मतांचे लीड देण्याचा निर्धार केला आहे. एकमेव शिरुर विधानसभा मतदार शरद पवार यांच्या विचारांचे अशोक पवार आमदार आहेत. मात्र, या ठिकाणी महायुतीकडून भाजपाचे मा. जिल्हा परिषद अध्यक्ष प्रदीप कंद यांच्यामाध्यमातून जोरदार मोर्चेबांधणी करण्यात आली आहे.

दरम्यान, महायुतीच्या प्रत्येक पदाधिकाऱ्यांवर 'टीम नमो' चा वॉच आहे. प्रत्येक पदाधिकारी त्यांना दिलेली जबाबदारी सक्षमपणे पार पाडतो किंवा नाही? याचा लेखाजोखा प्रदेश कार्यालयाकडे पाठवण्यात येणार आहे. त्याद्वारे अपेक्षीत काम न केलेल्या उमेदवारांचा, इच्छुकांचा 'रिपोर्ट' तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे महायुतीचे पदाधिकारी आता अंग झाडून कामाला लागले आहेत.

### अजित पवार तळ ठोकणार...!

बारामती लोकसभा मतदार संघाचे मतदान ७ मे रोजी पूर्ण झाल्यानंतर पुढील ३ ते ४ दिवस अजित पवार शिरुर लोकसभा मतदार संघामध्ये तळ ठोकणार आहेत. त्यामुळे मतदार संघातील प्रचारामध्ये 'बोटचेपी' भूमिका घेणाऱ्या पदाधिकाऱ्यांना उत्तरे द्यावी लागणार आहेत. अद्याप काही ठिकाणी राष्ट्रवादीचे स्थानिक नेते 'ॲक्टिव्ह' झालेले नाहीत. त्याबाबत अजित पवार स्वत: जातीने लक्ष घालतील असे सांगण्यात येते. त्यामुळे आढळराव पाटील यांची 'बारी' बसणार, असे वातावरण निर्माण झाले आहे.

### महायुतीची वज्रमूठ...

मोदी यांनी आपल्या भाषणात बोलताना राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे सर्वेसर्वा आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांना लक्ष्य केले. "गेल्या ४५ वर्षांपासून महाराष्ट्र अतृप्त आत्म्यांची शिकार ठरला आहे, " असा घणाघात केला. महाविकास आघाडीची मदार राज्यात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या खांद्यावर आहे. त्यामुळे महायुतीकडून या दोन्ही नेत्यांची कोंडी करण्याची रणनिती आखली आहे. दरम्यान, उरळी कांचन येथे शिरुरचे महाविकास आघाडीचे उमदेवार अमोल कोल्हे यांच्या प्रचारासाठी जाहीर सभा झाली. शरद पवार यांच्या सभेला अपेक्षीत प्रतिसाद न मिळाल्यामुळे महाविकास आघाडीच्या समर्थकांमध्ये अस्वस्थता पहायला मिळत आहे. दुसरीकडे, मोदींच्या सभेमुळे महायुतीला मात्र चैतन्य प्राप्त झाले आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.



# ‘मशाल’ विरोधकांना भस्म करेल!: पाटील

## पनवेल विधानसभेत संजोग वाघेरे यांच्या प्रचारार्थ गावभेट दौरा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।


**कुठलेही युद्ध जिंकायचे असेल, तर आपल्या हातात कुठले शस्त्र आहे. त्याची ताकद ओळखून त्या युद्धात उतरावे लागते. आमचे पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांनी आमच्या हातात “मशाल” हे शस्त्र दिले आहे. स्वाभीमान, निष्ठा आणि क्रांतीचे प्रतिक असलेली हीच “मशाल” विरोधकांना भस्म केल्याशिवाय राहणार नाही, अशा शब्दांत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबनदादा पाटील यांनी विरोधकांवर तोफ डागली.**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील पनवेल विधानसभेत गावभेट दौरा करत बैठका घेत आहेत. गावा गावात मोठ्या जल्लोषात त्यांचे स्वागत केले जात आहे. या दरम्यान झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या दौ-यात त्यांच्यासोबत शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख शिरीष घरत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे विशेष प्रतिनिधी आर. सी. घरत, पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष हेमराज म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास फडके, शिवसेना उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, पनवेल तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल, तालुका अध्यक्ष विश्वास पेटकर यांच्यासह महाविकास आघाडीतील मित्र पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील चीपळे गावापासून प्रचार बैठकांना प्रारंभ करण्यात आला. उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांचे महिलांनी औक्षण करीत मोठ्या उत्साहात स्वागत केले.

# जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर हवाई दलाचा टेम्पो उलटला

## पिंपरीत मोठी वाहतूक कोंडी



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर मोरवाडीत समतल विलगकामध्ये ( ग्रेड सेपरेटर) हवाई दलाचा टेम्पो उलटला. दुचाकीस्वाराला वाचविताना टेम्पो उलटल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, यामुळे मोठी वाहतूक कोंडी झाली असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. ही घटना मंगळवारी दुपारी दोनच्या सुमारास घडली.

जुन्या पुणे-मुंबई महामार्गाववरून हवाई दलाचा टेम्पो मुंबईच्या दिशेने जात होता. समतल विलगातून जात असताना मोरवाडीत टेम्पोला एक दुचाकीस्वार आडवा आला. त्याला वाचविताना टेम्पो उलटला. टेम्पोतून रस्त्यावर ऑइल गळती झाली आहे. रस्त्याच्या मध्यभागी टेम्पो उलटल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली. खराळवाडीतून वाहनांच्या रांगा लागल्या आहेत.

पिंपरी पोलीस आणि वाहतूक विभागाचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. अग्निशमन विभागाला बोलविण्यात आले. पाण्याने रस्ता धुवून काढला आहे. दरम्यान, टेम्पो सरळ करण्यासाठी क्रेन बोलविण्यात येणार आहे.

# महायुतीच्या पदाधिकाऱ्यांवर ‘मोदी की नजर’

## लोकसभा रणसंग्राम : पदाधिकाऱ्याच्या कामाची नोंद घेणार ‘टीम नमो’

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**‘अब की बार, चार सौ पार’ ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घोषणा प्रत्यक्षात उतरवण्यासाठी एक -एक जागा महत्त्वाची असल्याने सहा जणांचे खास पथक दिल्लीहून मावळ लोकसभा मतदारसंघात दाखल झाले आहे. महायुतीच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते विजयासाठी करत असलेल्या प्रयत्नांबाबत बारकाईने माहिती घेण्याचे काम सुरू आहे. या गोपनीय अहवालाच्या आधारे पुढील संधी मिळणार असल्याने महायुतीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मताधिक्य मिळवून देण्यासाठी चढाओढ लागल्याचे चित्र दिसत आहे.**

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी प्रचारात चांगलीच मुसंडी मारली आहे. तीन लाखांपेक्षा अधिक मताधिक्य मिळवून विजयी होण्याचा निर्धार महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. विक्रमी मताधिक्य मिळावे यासाठी दिल्लीहून आलेले हे पथक विशेष प्रयत्न करणार आहे.

चार श्रेण्यांमध्ये मूल्यांकन

बारणे यांचे मताधिक्य वाढवण्यासाठी प्रामाणिकपणे व जीव तोडून काम करीत असलेले पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या कामांची नोंद या पथकामार्फत घेतली जाणार आहे. पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या कामगिरीची चार श्रेणीमध्ये विभागणी करण्यात येणार आहे. सर्वोत्कृष्ट श्रेणीमध्ये आपले नाव राहावे यासाठी स्पर्धा लागल्याचे दिसून येत आहे.

### ब्लॅक लिस्ट : धोक्याची घंटा


महायुतीच्या घटकांमध्ये काही कार्यकर्ते वैयक्तिक राजकीय महत्त्वाकांक्षांपोटी प्रचारापासून अलिप्त राहत आहेत किंवा विरोधात काम करत असल्याचे दिसत आहे. प्रत्यक्ष माहिती घेऊन अशा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची नावे चौथ्या श्रेणीत अर्थात ‘ब्लॅक लिस्ट’मध्ये असणार आहेत. त्या संदर्भातील अहवाल संबंधित घटक पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनाही देण्यात येणार आहे. महायुतीच्या वतीने यापुढे ब्लॅक लिस्ट मधील कोणत्याही व्यक्तीला संधी देण्यात येणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे.



भूमिका

# महिला आरक्षण : मनसिकता बदलाची गरज

**लोकसभा निवडणुकीला सामोरे जात असलेल्या आपल्या देशातील एकूण ९६.८८ कोटी मतदारांमध्ये ४७ कोटी महिला मतदार आहेत. पहिल्यांदा मतदान करणाऱ्या २.६३ कोटी मतदारांपैकी १.४१ कोटी महिला मतदार आहेत.** विशेष म्हणजे, बारा राज्यांमध्ये पुरूषांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या अधिक आहे. २०४७ पर्यंतदेशातील महिला मतदारांची संख्या ५५ % म्हणजे पुरुषांपेक्षा अधिक असेल. ही आकडेवारी सांगण्याचे कारण म्हणजे, देशातील सर्व महिलांनी काही निश्चित हक्क आणि मागण्यांचा हट्ट धरला तर सत्तेवर कोण बसणार, हे त्या एकहाती ठरवू शकतात. त्यामुळे लोकशाहीमधील आपले हक्क, अधिकार मिळवण्यासाठी, तसेच राजकाणातील एखाद्या स्थानावर आपल्याला बसवले जात असताना काय मागायचे आणि कशाला भुलायचे नाही, याचे ज्ञान महिलांना असणे आवश्यक आहे.



डॉ. आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे राजकीय शक्ती हेच सामाजिक प्रगतीचे साधन आहे. पण, लोकशाहीच्या स्थापनेला ७६ वर्षे होऊनही महिलांना संसदेत केवळ १४ आणि राज्यांच्या विधिमंडळात १६ टक्के प्रतिनिधित्व दिले गेले. दुसरीकडे, महिलांना राजकीय प्रक्रियेत सामील करून घेण्याच्या बाबतीत १९३ देशांमध्ये भारताचा क्रमांक १४९ वा आहे. २००८ पासून आजवर त्या त्या वेळच्या सरकारांनी महिला आरक्षणाची कक्षा वाढवण्याबाबत चालढकल केल्याचे दिसते. आता ३३ टक्के आरक्षणाचा कायदा आला असला, तरी प्रत्यक्षात त्याचा अंमल २०२९ पासून होणार आहे. एकीकडे ही स्थिती असताना, सध्याच्या १४ आणि १६ टक्के प्रतिनिधित्वालाही तसे फारसे महत्त्व असल्याचे दिसत नाही. कारण या आरक्षणातील बहुतांश महिला प्रस्थापित राजकीय घराण्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या असून, स्त्रियांच्या सामाजिक न्यायापेक्षा आपल्या घरात सत्ता राहावी म्हणून राजकारणात आणल्या गेल्या आहेत. या संधीचा लाभ घेत अन्य महिलांना राजकीय अवकाश मिळवून देणे, ही आपली जबाबदारी असल्याची भावना त्यांच्यामध्ये दिसत नाही. आपण साऱ्या जणी एक आहोत, या अस्मितेने देशातील सगळ्या महिला कधी जोडल्या गेल्या नाहीत. एकीकडे देशाच्या सर्वोच्च पदावर महिला विराजमान होत असताना, सामान्य महिलांच्या आयुष्यातही आमूलाग्र बदल घडत असल्याचे चित्र दिसत नाही. परिणामी देशातील स्त्री वर्ग मतदान करताना समोरचा उमेदवार ही एखादी महिला असेल, तरी ती पुढे आपल्या हिताची कामे करेल, अशा भावनेने मतदान करत नाहीत.

महिला वर्गामध्ये उमेदवारांविषयी, विशेषत: महिला उमेदवारांविषयी, मग तो कोणत्याही पक्षाशी संबंधित असो; विश्वासांची भावना असणे खूप महत्त्वाचे आहे. असा विश्वास राजकीय क्षेत्रात काम करीत निवडणुकीच्या रिंगणात उतरणाऱ्या प्रत्येक महिलेने संपादन करायला हवा. मध्य प्रदेशात झालेल्या विधानसभा निवडणुकीत महिलांसाठीच्या योजनेला त्यांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळाल्याचे समोर आले. त्याचवेळी मतदानातील स्त्रियांच्या सहभागाचे महत्त्वही अधोरेखित झाले. त्यामुळे आता सर्वच पक्ष महिलांच्या मतांसाठी अनेक घोषणा करीत आहेत. यातील बहुतांश घोषणा स्त्रियांना रोख रक्कम, धान्य किंवा बस - रेल्वे प्रवासात सवलत देणाऱ्या अशा स्वरुपाच्या आहेत. वास्तवात केवळ रोख रक्कम अथवा काही सवलती देऊन महिलांचे सामाजिक उत्थान होणार नाही. शिवाय, अशा रकमेवर महिलांचा अधिकार किती असतो, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. त्यामुळे एकूणच अशा वरवरच्या घोषणांतून त्यांचे शाश्वत आर्थिक, सामाजिक सक्षमीकरण साध्य होत नाही.

महिलांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी होणाऱ्या चळवळींचे रुपांतर राजकीय मागण्या पूर्ण करण्यासाठीच्या शक्तीमध्ये होत नाही, हीसुद्धा एक महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे रोख रकमेपेक्षाही व्यक्तिगत, सामाजिक सुरक्षितता आणि त्याच्याशी निगडीत प्रकरणांमध्ये जलद न्याय मिळण्यासाठी महिलांचा आग्रह असला पाहिजे. किंबहुना, राजकीय पक्षांकडे त्यासाठीच हट्ट धरला पाहिजे. महिलांना राजकारणात स्थान देणाऱ्या पक्षांनीही आता त्यांच्याविषयीची मानसिकता बदलायला हवी.

## संपादकीय »

# सलमानी सुल्तानी!

***माणूस अनेक बाबतीत इतर प्राण्यांपेक्षा अनेक गोष्टींत वेगळा ठरतो. याविषयीचे कितीतरी मुद्दे समोर ठेवता येतील. त्यातला कुठला मुद्दा महत्त्वाचा?***

आम्हाला नेहमी वाटतं माणसाला भाषेचे वरदान असणे, त्याआधारे त्याने व्यक्त केलेले विचार, त्यांच्या आदान-प्रदानाकरता निर्माण केलेली 'पुस्तक' नावाची गोष्ट हा माणसाचा सर्वात महान शोध आहे. हे अधोरेखित करण्याचे निमित्त म्हणजे या महिन्यातील जागतिक पुस्तक दिन! नुकताच २३ एप्रिल हा दिवस पुस्तक दिन म्हणून जगात साजरा झाला.जगात अनेक भाषांमध्ये, विविध साहित्य प्रकारांमध्ये असंख्य पुस्तके लिहिली जातात. आपले कुतूहल शमवणारी, आपली जिज्ञासा जिवंत ठेवणारी, प्रश्नांची उत्तरे देणारी आणि प्रश्न उपस्थित करणारी, आपल्या जगण्याचा अवकाश भारून टाकणारी! या भडीमारात ज्ञानाची लालसा हरवून गेली. कवी गुलजार यांची पुस्तकांविषयीची सुंदर कविता माझ्या वाचनात आली, या कवितेचा आशय काहीसा असा आहे; पुस्तके, जी डोकावतात, बंद कपाटाच्या काचांतून. मोठ्याउत्सुकतेने पाहतात. आता महिनोन् महिने पुस्तकांशी भेट होत नाही.

व्यक्तिसापेक्ष आचार, विचार, सुखदुःख यांच्या आलेखाचे चढउतार ठरलेले असतात. सर्वस्व घेऊन आलेली आणि सर्वस्वाला वाहिलेली माणसं हाताच्या बोटांएवढीचं म्हणता येतील. वळणा-वळणाशी हुलकावण्या देणाऱ्या, ओंजळभर सुखापेक्षा दु:खाचे दाह भयंकर असतात. आलेले अनुभव चांगल्या-वाईट गोष्टीस नेहमीच कारणीभूत ठरतात. त्यावेळी तुम्ही काय निर्णय घेता यावर सर्वस्व अवलंबून असते.

खरं तर निर्णय घेण्याची वा देण्याची क्षमता, नसणं हा मुखत्वे आत्मविश्वासाचा नसण्याचा भाग झाला. एखादी गोष्ट तुम्हाला करायचीयं, पण करता येत नाहीय, किंबहुना म्हणावा तेवढा आत्मविश्वास, तेवढं बळ अंगी आणता येत नाहीय. या प्रकारच्या स्थितीतली अवस्था म्हणजे; चिंतन, मनन, अवलोकन यांचा अभाव.

या परिस्थितीतल्या व्यक्तींचं जीवन गुंतागुंतीचं होतं. हो – नाहीच्या संभ्रमित अवस्थेत कोणतीचं गोष्ट साध्य होत नाही. यास्तव वैयक्तिक स्तर खालावतो. याचा सापेक्ष परिणाम अर्थात कार्यक्षमतेवर जाणवू लागतो. अस्वस्थता, अंदाजे निर्णय घेणे यामुळे पश्चातापाची पाळी येते. अशा लोकांमध्ये स्थिरतेचा कायम अभाव दिसून येतो. आजचं हसतं खेळतं चित्र उद्या दिसेलचं असं नाही. अशा लहरी स्वभावाची अनेक उदा. देता येतील. वेळा न पाळणं, न पटणारी कारणं देणं, अविचाराने आत्मघातास प्रवृत्त करणं. ठोस निर्णयाप्रती न येणं; ही सगळी कमकुवत विचारांची लक्षणं होत.

एखादी गोष्ट वारंवार तपासून पाहणं. चंचलतेमुळे एकाग्रतेची क्षमता नष्ट होणं.



यातल्या बऱ्याचं जणांना आपल्याला नेमक काय होतंय, हे देखील सांगता येत नाही. मग मनातले दोष वृत्तीवर घाव घालण्यास कारणीभूत ठरतात. पुढे जाऊन वृत्ती विकारास परावृत्त करते. कधी गरम तर कधी थंडी वाजणं, भूक न लागणं, तर कधी अतिरिक्त आहार घेणं वाढीस लागतं. सतत कपडे बदलण्याची सवय जडणं, तर कधी पाय हलवण्याची वाईट सवय लागणं. ही सगळी ढासळलेल्या मानसिकतेची लक्षणं दाखवतात.

लहानपणापासून निर्णयक्षमता कमी असलेल्या एका तरुणाचं मन नोकरी व्यवसायत रमत नव्हतं. दुसऱ्या नोकरीची संधी येताचं पहिल्या नोकरीवर पाणी सोडण्याच्या स्वभावामुळे, थाटलेल्या व्यवसायाला गती येईना. परिणामी मिळकत आणि कुटुंबावर आलेली दु:खाची कळा त्याच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरली ती अगदी शेवटपर्यंत. म्हणून तर आपल्याकडे सुसंगती सदा, घडो सृजनवा, हा विचार पूर्वीपासून आलाय. बहुमताचा विचार करणे, ही निर्णय घेण्यामागची प्रमुख प्रक्रिया यशाची गुरुकिल्ली ठरते. योग्य वेळी योग्य निर्णय त्याने जीवन सुखमय हा धागा सांधला तर, येणारा प्रत्येक मार्ग यशाकडे घेऊन जाणारा दीपस्तंभ ठरेल.

आज एकविसाव्या शतकाने सगळी दालनं खुली केली असताना; तुमचा एक चांगला निर्णय जीवन घडवेल तर एक चुकीचा निर्णय तुम्हाला तळ गाठायला लावेल. एवढी ताकद या निर्णय क्षमतेत सामावली आहे. अनमोल जीवन सुंदर, समृद्ध करा. जीवन रहस्याचा सळसळता आनंद ताज्या मनानं घ्यायला शिका. दैवी देणगी म्हणून तिचा स्वीकार करा. अचूक निर्णयाप्रती भावी पिढीने केलेला सकारात्मक दृष्टीचा विचार; पुढे जाऊन वर्तमानातील दरवाजे भविष्यकाळाच्या उज्ज्वल भवितव्याचे स्वागत करण्यास उत्सुक असतील. आपल्या हुशारीने, कला-कौशल्यासह निर्णय क्षमतेला कोंदणात बसवा आणि आपला परीपूर्ण विकास साधा.

## ।। अभंगवाणी ।।



जन्माचे तें मूळ पाहिलें शोधून । दु:खासी
कारण जन्म घ्यावा॥१॥
पापपुण्य करूनी जन्मा येतो प्राणी । नरदेही
येऊनी हानी केली ॥ २ ॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मार्केट, गाळा क्र. 79/80, पिंपरी, पुणे-411018. येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.

(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुंबईतील आणखी एक जागा शिंदेंच्या पारड्यात

## लोकसभा रणसंग्राम : अमोल कीर्तिकरांना कट्टर शिवसैनिकाचं आव्हान!

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ठाकरे गटातून शिंदे गटात गेलेले रविंद्र वायकर यांना उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर झाली आहे. रविंद्र वायकर हे जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे आता ठाकरेंच्या अमोल कीर्तिकरांविरोधात शिंदेंच्या रविंद्र वायकरांचा सामना रंगणार आहे.**



शिवसेनेचे कट्टर नेते रविंद्र वायकर यांनी गेल्या महिन्यांत शिंदे गटात प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशानंतर त्यांना लोकसभेचं तिकिट मिळणार असल्याची चर्चा सुरू झाली होती.

या जागेवरून ठाकरे गटाकडून अमोल कीर्तिकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर, अमोल कीर्तिकर यांचे वडील आणि शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते गजानन कीर्तिकर हे या मतदारसंघाचे विद्यमान खासदार आहेत. अमोल यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर गजानन कीर्तिकर यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे महायुतीतून या जागेवरून कोणाला उमेदवारी मिळणार याकडे सर्वांचं लक्ष होतं. दरम्यान, रामदास कदम यांच्या मुलाचंही नावही या जागेसाठी चर्चेत होतं. यावरून कीर्तिकर आणि कदम यांच्यात शाब्दिक युद्धही रंगलं होतं. परंतु, महायुतीतून कोणाचंही नाव जाहीर करण्यात आलं नाही. अखेर, महायुतीने आता रविंद्र वायकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

### रविंद्र वायकर यांच्यावर आरोप

वायकर यांची अलीकडेच ईडीने सखोल चौकशी केली होती. जोगेश्वरीत राखीव भूखंडावर हॉटेल उभारून आर्थिक फायदा उकळल्याबद्दल वायकर यांच्या विरोधात ईडीने चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणात त्यांच्या पत्नीच्या विरोधातही गुन्हा दाखल झाला आहे. वायकर हे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे एकेकाळी निकटवर्तीय मानले जात असत. मुंबई महानगरपालिकेची आर्थिक तिजोरी समजल्या जाणाऱ्या स्थायी समितीचे वायकर यांनी अध्यक्षपदही भूषविले होते. ठाकरे व वायकर कुटुंबीयांनी रायगड जिल्ह्यात बेहिशेबी मालमत्ता केल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. जोगेश्वरीमध्ये राखीव भूखंडावर वायकर यांनी आधी क्लब व नंतर हॉटेलचे बांधकाम सुरू केले होते. यातून वायकर यांनी पैशांचा अपहार केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.



# मावळात महाविकास आघाडीचा घरोघरी प्रचार

## लोकसभा रणसंग्राम : पिंपरी व चिंचवड विधानसभेत मतदारांपर्यंत पोहोचली ‘मशाल’

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदार संघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांचा महाविकास आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून घरोघरी जाऊन जोरदार प्रचार केला जात आहे. पिंपरी आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघात सर्वसामान्य नागरिक, सोसायट्यांमध्ये जाऊन मशाल चिन्ह पोहोचवले जात संजोग वाघेरेंना विजयी करण्याचे आवाहन केले जात आहे.**



मतदार संघातील गेल्या दहा वर्षातील नागरिकांच्या आरोग्य सुविधा, रोजगार, शिक्षण, वाढती महागाई, बेरोजगारी, समाजातील शांतता, कायदासुव्यवस्था या प्रश्नांवर मतदारांशी चर्चा केली जात आहे. या सोबत मतदारसंघातील प्रश्न सोडविण्यासाठी आणि आपल्यासोबत राहणारा तुमचा प्रतिनिधी म्हणून संजोग वाघेरे पाटील यांना विजयी करण्याचे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहर संघटिका अनिताताई तुतारे, मयूर जाधव यांच्यासह मित्र पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते करत आहेत.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे हे सर्वसामान्य कुटुंबातील असून मावळ लोकसभा मतदारसंघ लढवत आहेत. त्यांचे चिन्ह “मशाल” मतदारांपर्यंत पोहचवत आहेत. तसेच सर्वसामान्य, गोरगरिबांचे प्रश्न सोडविण्याचे त्यांचे ध्येय आहे, असे सांगत पदाधिकारी आणि कार्यकर्ते मतदारांमध्ये प्रचार करीत आहेत. सोसायट्यांमध्ये जाऊन भेटीगाठी व संवाद साधला जात आहे. पिंपरी व चिंचवड विधानसभेतील सर्वच भागात मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

### धनशक्ती विरुद्ध जनशक्ती - बाबर

लोकसभेची ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती असे ब्रीद घेवून सर्वसामान्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी मावळ लोकसभा मतदार संघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या “मशाल” चिन्हावर शिक्कामोर्तब करून मावळचे शिलेदार लोकसभेत पाठविण्यासाठी त्यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन मावळ लोकसभेचे प्रचार प्रमुख योगेश बाबर यांनी या वेळी केले. पदाधिकारी आणि कार्यकर्ते “फेस टू फेस” मतदारांना भेटून शहरातील सोसायटीमध्ये प्रचार करीत असून रोजगार, शिक्षणाला बळ, कष्टकरी, मजूर, भूमिहीन शेतकरी, कामगार अशा विविध घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी उमेदवार संजोग वाघेरे पाटील हे नक्कीच प्रयत्नशील असतील, असेही प्रचार प्रमुख बाबर म्हणाले आहेत.



## उत्तराखंड सरकारकडून पतंजलीच्या 14 उत्पादनांचा परवाना रद्द

# योगगुरु बाबा रामदेव यांना मोठा धक्का

## भारतीय वैद्यकीय संघटनेची याचिका : राज्य परवाना प्राधिकरणाची कारवाई

। नवी दिल्ली । महाईन्यूज । टीम ऑनलाईन।

**योगगुरु रामदेवबाबा आणि पतंजली आयुर्वेद संस्थेचे संचालक आचार्य बाळकृष्ण यांनी नुकतीच सर्वोच्च न्यायालयात बिनशर्त माफी मागितली. तसेच वर्तमानपत्रात दिलगिरी व्यक्त करणारी जाहिरातही छापली. त्यानंतर बाबा रामदेव यांना आणखी एक धक्का बसला आहे.**



उत्तराखंड सरकारच्या आयुर्वेदिक आणि युनानी सेवा राज्य परवाना प्राधिकरणाने (SLA) पंतजली आयुर्वेद लिमिटेड आणि दिव्या फार्मसी या कंपनीच्या १४ उत्पादनांचा परवाना रद्द केला आहे. 'औषध आणि प्रसाधने कायदा, १९४५' यामधील तरतुदींचा वारंवार भंग केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली असल्याचे उत्तराखंडमधील राज्य परवाना प्राधिकरणाने सोमवारी (दि. २९ एप्रिल) सर्वोच्च न्यायालयात सांगितले.

प्राधिकारणाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले की, आम्ही १५ एप्रिल २०२४ रोजी दिव्या फार्मसी आणि पतंजली आयुर्वेद लिमिटेडचे परवाना रद्द करणारा आदेश काढला आहे. पतंजलीच्या श्वासारी गोल्ड, स्वासारी वटी, ब्रोंकोम, श्वासारी प्रवाही, श्वासारी अवलेह, मुक्त वटी एक्स्ट्रा पॉवर, लिपिडोम, बीपी ग्रीट, मधुग्रीत, मधुनाशिनी वटी एक्स्ट्रा पॉवर, लिवामृत एडवांस, लिवोग्रिट, आईग्रिट गोल्ड आणि पतंजली दृष्टी आय ड्रॉप या उत्पादनांचा परवाना तात्काळ रद्द करण्यात आला आहे..

भारतीय वैद्यकीय संघटनेने दाखल केलेल्या याचिकेवर गेल्या काही दिवसांपासून सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती अमानतुल्ला यांच्या खंडपीठाने १० एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान उत्तराखंड परवाना प्राधिकरणाने काय कारवाई केली, याचा जाब विचारला होता.

### प्राधिकरणाची भूमिका काय?

यावर उत्तर देताना प्राधिकारणाने म्हटले की, १६ एप्रिल रोजी हरिद्वारच्या जिल्हा आयुर्वेदिक आणि युनानी अधिकारी यांनी स्वामी रामदेव, दिव्या फार्मसी आणि पतंजली आयुर्वेद लिमिटेडच्या विरोधात औषध आणि प्रसाधने कायद्याच्या कलम ३, ४ आणि ७ अनुसार फौजदारी तक्रार दाखल केली आहे. प्राधिकरणाने पुढे म्हटले की, २३ एप्रिल रोजी उत्तराखंडमधील सर्व आयुर्वेदिक आणि युनानी औषधांच्या कारखान्यांना नोटीस पाटविली आहे. प्रत्येक आयुर्वेदिक आणि युनानी औषध निर्मात्या कंपन्यानी आयुष मंत्रालयाने दिलेल्या निर्देशांचे आणि औषधे व प्रसाधने कायद्याच्या तरतुदीचे पालन करावे, असे या नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.

# टी-20 वर्ल्ड कपसाठी भारतीय संघ जाहीर

## भारतीय वैद्यकीय संघटनेची याचिका : राज्य परवाना प्राधिकरणाची कारवाई

। नवी दिल्ली । महाईन्यूज । टीम ऑनलाईन।

**आयपीएल हंगाम सुरू असतानाच टी-20 विश्वचषकासाठी भारतीय संघाची घोषणा झाली आहे. रोहित शर्मा संघाचे नेतृत्व करणार आहे. तर हार्दिक पंड्या टीमचा उप-कर्णधार राहील. विशेष म्हणजे, वर्ल्ड कपच्या संघातून केएल राहुलला दूर ठेवण्यात आले. तर युजवेंद्र चहल आणि ऋषभ पंत यांची संघात एंट्री होत आहे. टी-ट्वेंटी वर्ल्ड कपसाठी एकूण 19 खेळाडूंच्या नावाचा विचार करण्यात आला होता. त्यातील 15 खेळाडू वर्ल्ड कपसाठी अमेरिकेला रवाना होतील. तर 4 खेळाडूंना रिझर्व म्हणून निवडण्यात आलंय.**



### टीम इंडियाचं वेळापत्रक -

5 जून, बुधवार - भारत विरुद्ध आयरलँड, न्यूयॉर्क.
9 जून, रविवार - भारत विरुद्ध पाकिस्तान, न्यूयॉर्क.
12 जून, बुधवार - यूएसए विरुद्ध भारत, न्यूयॉर्क.
15 जून, शनिवार - भारत विरुद्ध कनाडा, फ्लोरिडा.

तब्बल 14 महिन्यानंतर ऋषभ पंतचं टीम इंडियामध्ये कमबॅक झालं आहे. तर आयपीएलमध्ये दमदार कामगिरी करणाऱ्या संजू सॅमसनला देखील 15 खेळाडूंमध्ये स्थान मिळालंय. त्याचबरोबर रोहित शर्मासोबत सलामीवीर म्हणून यशस्वी जयस्वाल उतरणार आहे. विराट कोहली आणि सूर्यकुमार यादव याशिवाय शिवम दुबेला देखील प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळू शकते. या तीन खेळाडूंवर मिडल ऑर्डरची जबाबदारी राहिल. तर हार्दिक पांड्या, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल या स्टार ऑलराऊंडरवर टीम इंडियाची भिस्त असणार आहे.

गोलंदाजी डिपार्टमेंटमध्ये कुलदीप यादव आणि युजवेंद्र चहल यांच्यावर फिरकीची जबाबदारी असेल तर जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंह आणि मोहम्मद सिराज या तीन फास्टर गोलंदाजांवर मोठी जबाबदारी असणार आहे. एवढंच नाही तर शुभमन गिल, खलिल अहमद, आवेश खान, रिंकू सिंग या चार खेळाडूंना रिझर्व म्हणून ठेवण्यात आलं आहे.

**टीम इंडिया** - रोहित शर्मा (कर्णधार), यशस्वी जायसवाल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, ऋषभ पंत (विकेटकीपर), शिवम दुबे, हार्दिक पंड्या (उपकर्णधार), रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंह, युजवेंद्र चहल, संजू सॅमसन (विकेटकीपर), मोहम्मद सिराज.

रिझर्व खेळाडू - शुभमन गिल, खलिल अहमद, आवेश खान, रिंकू सिंग.

# ऐश्वर्या राय -सुष्मिता सेनमधील कोल्ड वॉरचं सत्य 30 वर्षांनंतर उघड




बॉलिवूडमध्ये अभिनेत्रींमध्ये कॅट फाइटचे अनेक किस्से आहेत. श्रीदेवीपासून शिल्पा शेट्टी आणि रवीना टंडनसह अनेक हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये अनेक वादाच्या बातम्या वाचायला मिळतात. या कोल्ड वॉरमधील अजून एक किस्सा आहे, ऐश्वर्या राय बच्चन आणि सुष्मिता सेन यांमध्ये मिस वर्ल्ड स्पर्धेच्या वेळी वाद होता अशा बातम्या समोर आल्या होत्या. नेमकं त्या दोघींमध्ये कशावरुन वाद होता आणि त्या एकमेकींशी का बोलत नाहीत, याबद्दल कुठलं कारण समोर आलं नव्हतं.

पण आज 30 वर्षांनंतर ऐश्वर्या राय आणि सुष्मिता सेन यांच्यामधील वादाचे सत्य समोर आले आहेत. हा वाद 1994 मिस इंडिया स्पर्धेच्या वेळी झाल्याचं अनेक मीडिया रिपोर्टमध्ये म्हटलं गेलं होतं. या स्पर्धेमधील सहस्पर्धक मानिनी डे हिने या सर्व प्रकरणाचा खुलासा केलाय.

**1994 मिस इंडिया स्पर्धेत नेमकं काय घडलं होतं?**

तुम्हाला जाणून आश्चर्य वाटेल की, 'जस्सी जैसी कोई नहीं' आणि 'अम्मा अँड फॅमिली' यामधील मानिनी डे या अभिनेत्री 1994 मध्ये मिस इंडिया स्पर्धेत टॉप 10 स्पर्धकांच्या यादीत स्थान पटकावलं होतं. सिद्धार्थ काननला दिलेल्या मुलाखतीत तिने या स्पर्धेदरम्यान काय काय झालं होतं याबद्दल मनमोकळ्या गप्पा मारल्या.

**सुष्मिता सेनेचं केलं कौतुक!**

या मुलाखतीत मानिनी म्हणाली की, मला सुष्मिता सेनचं आभार मानायचं आहेत. तिनेच मला मिस इंडिया स्पर्धेसाठी फॉर्म भरायला लावलं. तिने माझ्या हात धरला आणि मला फॉर्म भरण्यास प्रोत्साहन दिलं. ती पहिली व्यक्ती आहे जिने मला म्हटलं तू खूप सुंदर आहेस. खरं तर एक महिला दुसऱ्या महिलेला सुंदर म्हणतं नाही. त्यामुळे तिचं हे वाक्य मला खूप आवडलं.

## इम्रानच्या कमबॅक चित्रपटाची निर्मिती

आमिर खानचा भाचा अभिनेता इम्रान खान त्याच्या अभिनयाच्या कमबॅकमुळे चर्चेत आहे. तो लवकरच 9 वर्षांनंतर कॉमेडी चित्रपटातून अभिनयात पुनरागमन करणार असल्याचे ऐकू येत आहे. या चित्रपटाची निर्मिती त्याचा मामा आमिर खान करणार आहेत. इमरानच्या या कमबॅक कॉमेडी चित्रपटाचे दिग्दर्शन अभिनेता वीर दास करणार आहे. हा त्याचा दिग्दर्शकीय पदार्पण चित्रपट असेल. पीपिंग मूनच्या वृत्तानुसार, या चित्रपटाचे शीर्षक 'हॅपी पटेल' असेल. निर्मात्यांनी या चित्रपटाचे शूटिंग गोव्यात सुरू केले आहे. या अभिनेत्याने 8 महिन्यांपूर्वी त्याच्या पुनरागमनाचे संकेत दिले होते. तेव्हापासून तो या चित्रपटाची तयारी करत असल्याचे समजते. याआधी 2008 मध्ये रिलीज झालेला इम्रानचा डेब्यू चित्रपट 'जाने तू या जाने ना' हा देखील मामा आमिर खानने प्रोड्यूस केला होता. यानंतर 2011 मध्ये रिलीज झालेल्या 'डेली बेली'मध्येही दोघांनी एकत्र काम केले होते. हे दोन्ही चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरले होते. बाल कलाकार म्हणून इम्रान आमिरच्या 'कयामत से कयामत तक' आणि 'जो जीता वही सिकंदर' या दोन चित्रपटांमध्येही दिसला होता. इम्रानने त्याच्या करिअरमध्ये आतापर्यंत 12 चित्रपटांमध्ये काम केले आहे, त्यापैकी फक्त 4 चित्रपट 'जाने तू या जाने ना', 'आय हेट लव्ह स्टोरीज', 'दिल्ली बेली' आणि 'मेरे ब्रदर की दुल्हन' हिट ठरले.

## प्रियांकाला हॉलिवूडमध्ये संघर्ष!

मिस वर्ल्डचा किताब पटकावल्यानंतर आणि बॉलिवूडमध्ये स्वतःचे नाव कमावल्यानंतर प्रियंका चोप्रा हॉलिवूडकडे वळली. यानंतरही तिला तेथे संघर्ष करावा लागला. बॉलीवूडची आघाडीची अभिनेत्री असूनही प्रियंकाने शून्यातून सुरुवात केली.प्रियंकाच्या आयुष्यातील हा काळा काळ होता. इंडस्ट्रीत तिला ना कोणी मित्र होते, ना ती कोणाला ओळखत होती. न्यूयॉर्क शहरातही तिची ओळख नव्हती.मात्र, एवढ्या अडचणींनंतरही तिने हार मानली नाही. परिस्थिती तिच्या अनुकूल नव्हती, तरीही तिने लढा देऊन स्वतःचे नाव कमावले. प्रियंकाने 2017 मध्ये बेवॉच या चित्रपटाद्वारे हॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या सर्व गोष्टी प्रियंकाने स्वतः नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत सांगितल्या आहेत. कंव्हानॉफ जेम्सच्या पॉडकास्टमध्ये प्रियंकाने हॉलिवूडमधील तिच्या सुरुवातीच्या दिवसांबद्दल सांगितले. ती म्हणाली- मला हा उद्योग माहित नव्हता. तिथली लोकं ओळखीचे नव्हते. तिथे एकही मित्र नव्हता जो मला पहाटे 2 वाजता कॉल करेल, जे खूप महत्वाचे आहे. मी खूप एकटी होतो आणि हे सर्व खूप भीतीदायक होते. न्यूयॉर्क शहर देखील माझ्यासाठी अंधाराने भरलेले होते.



प्रियंकाने सांगितले की, सहा टॉप मॅगझिन कव्हरमध्ये तिचा समावेश करण्यात आला होता. भारतात तिची जबरदस्त फॅन फॉलोइंग होती, पण तरीही हॉलिवूडमध्ये तिला शून्यापासून सुरुवात करावी लागली. इतकंच नाही तर तिथले लोक प्रियंकाला भेटायलाही तयार नव्हते, हे खूप दुःखी होतं. मात्र, या सगळ्यानंतर प्रियंकाने स्वतःला तुटू दिले नाही. प्रियंका पुढे म्हणाली की ती खूप महत्वाकांक्षी महिला आहे. जेव्हा आपल्याकडे दुसरा पर्याय नसतो तेव्हा परिस्थितीशी तडजोड केली पाहिजे, असे तिचे मत आहे. हेच कारण होते ज्याच्या मदतीने तिने स्वतःला कठीण परिस्थितीतून बाहेर काढले.

## आई-वडिलांमुळे चित्रपट नाकारायची मृणाल

मृणाल ठाकूरने आपल्या आई-वडिलांमुळे अनेक चित्रपटांमध्ये काम करण्यास नकार दिल्याचा खुलासा केला आहे. वास्तविक, चित्रपटात इंटिमेट सीन करू नयेत, असे पालकांचे सक्त आदेश होते. या भीतीमुळे अनेक चांगले चित्रपटही तिच्या हातून गेले. मात्र, काही वेळाने तिने या विषयावर आई-वडिलांशी चर्चा केली. कथेनुसार काही गोष्टी करायच्या आहेत, असे तिने पालकांना समजावून सांगितले. मृणालने असेही सांगितले की ती स्वत: इंटिमेट सीन करण्यास कम्फर्टेबल नाही, पण प्रत्येक वेळी चित्रपटांमध्ये ती आपली निवड लादू शकत नाही. एका मुलाखतीत मृणालने सांगितले की, आई-वडिलांचा विरोध असल्याने तिने अनेक चित्रपट नाकारले होते. ती म्हणाली- मी घाबरून जायचे आणि कोणत्याही चित्रपटाला नाही म्हणायचे. पण मी किती वेळ नाही म्हणू शकले? एक वेळ अशी आली की मला माझ्या पालकांशी बोलायचे होते. मी पप्पांना म्हणालो- पापा, मी प्रत्येक चित्रपट सोडू शकत नाही कारण कधी कधी असे घडते, ही माझी निवडही नसते.मृणालने असेही सांगितले की, ती स्वत: अशी दृश्ये करताना अस्वस्थ आहे. मृणालने पुढे सांगितले की, काही काळानंतर तिने ठरवले होते की ती कुठलाही चित्रपट करणार नाही कारण त्यात किसिंग सीन आहे. तिला स्क्रिप्टनुसार जे आवश्यक असेल ते करावे लागेल. ती पुढे म्हणाली- मला अनेक चित्रपट करायचे होते. पण किसिंग सीन्समुळे मला चित्रपट सोडावे लागले. एक अभिनेता असल्याने तुम्हाला अशा सीनसाठी तयार असायला हवे कारण कथेनुसार ते सीन आवश्यक असतात. तुम्हाला सोयीस्कर नसल्यास, तुम्ही बोलू शकता. तुम्ही बोलू शकता, पण त्यामुळे मी चित्रपट सोडत होते.



## तमन्नाने 'ईडी'कडे वेळ मागितली!

अभिनेत्री तमन्ना भाटियाने अद्याप ईडीच्या समन्सला उत्तर देण्यासाठी वेळ मागितला आहे. तमन्नाच्या म्हणण्यानुसार, ती सध्या मुंबईत नाही. तिने समन्सला उत्तर देण्यासाठी महाराष्ट्र सायबर सेलकडे वेळ मागितला आहे. हे प्रकरण ऑनलाइन गेमिंग आणि बेटिंग प्लॅटफॉर्मशी संबंधित फेअरप्ले ॲपवर IPL 2023 च्या प्रसारणाशी संबंधित आहे.

महाराष्ट्र सायबर सेलने तमन्नाला 29 एप्रिलपर्यंत समन्सला उत्तर देण्यास सांगितले होते. याच प्रकरणात संजय दत्त आणि रॅपर बादशाह यांनाही समन्स पाठवण्यात आले आहेत. संजय दत्तनेही उत्तर देण्यासाठी प्राधिकरणाकडे वेळ मागितला आहे.

आतापर्यंत डझनभर सेलिब्रिटींची नावे समोर आली आहेत, अलीकडे तमन्ना अडकली महादेव बेटिंग ॲपमध्ये आतापर्यंत डझनभर सेलिब्रिटींची नावे आली आहेत. यामध्ये रणबीर कपूर, कपिल शर्मा आणि जॅकलिन फर्नांडिससह अनेक बड्या सेलिब्रिटींचा समावेश आहे. अलीकडे तमन्ना भाटियाही यात अडकल्याचे दिसत आहे.मुंबई सायबर सेलला तमन्नाचा जबाब नोंदवायचा आहे. फेअर प्लेसाठी तिच्याशी कोणी संपर्क साधला आणि त्यासाठी तिला किती पैसे मिळाले हे तिला विचारले जाईल.

# चॅम्पियन्स ट्रॉफी पाकिस्तानमध्ये!

## भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफी खेळण्यास पाकिस्तानात जाणार नाही?

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पाकिस्तान क्रिकेट बोर्डने (PCB) चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी लाहोर, कराची व रावलपिंडी या जागांची निवड केली आहे. हा प्रस्ताव त्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट कौन्सिलला (ICC) पाठविला आहे. पण भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफी खेळण्यास पाकिस्तानात जाणार नसल्याचे समोर येत आहे. त्यामुळे भारताचे सामने कुठे खेळलायचे, याचा विचारही पाकिस्तानने केला आहे.**






**भारतीय संघ पाकिस्तानात जाणार का ?**

मार्च महिन्यात सुत्रांद्वारे असे समोर आले होते की, आयसीसी एशिया कपसारखे 'हाइब्रिड मॉडेल' वापरु शकते. आयसीसीच्या कार्यकारी बोर्डाने म्हटले होते की, जर भारत सरकार भारतीय संघाला पाकिस्तानात पाठवणार नसेल तर, आम्ही तेथील बोर्डवर दबाव टाकू शकत नाही त्यामुळे एक वेगळा पर्याय आपल्याला शोधावा लागेल.

**स्पर्धेत ८ संघ होणार सहभागी..**

२०१७ मध्ये इंग्लंड व वेल्समध्ये चॅम्पियन्स टॉफीचे आयोजन केले होते ज्यात पाकिस्तानने भारताला फायनलमध्ये पराभूत करत जेतेपद मिळविले होते. आयसीसीच्या जागा निरिक्षण करण्याच्या प्रकियेनंतर सामन्याचे वेळापत्रक सादर होऊ शकते. या स्पर्धेत ८ संघाचा समावेश असणार आहे. पुढच्या वर्षी फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात चॅम्पियन्स टॉफीचे सामने खेळले जाणार आहेत, त्यासाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डने तीन जागा निश्चित केल्या आहेत. लाहोर, कराची व रावळपिंडी जागांचा आराखडा आयसीसीला पाठवला आहे. मात्र, भारतीय संघ पाकिस्तानचा दौरा करेल की, 'हाइब्रिड मॉडल' वापरले जाणार याबाबत अद्याप काही स्पष्ट झाले नाही. पाकिस्तान व भारत या दोन देशातील वैमनस्य जगजाहीर आहे. भारत व पाकिस्तान सामना पाहण्यासाठी भारतीय क्रिकेटप्रेमी उत्सुक असतात. भारतीय संघ पाकिस्तानमध्ये खेळायला जाणार नाही, हे जवळपास स्पष्ट आहे. कारण भारत सरकार आपल्या संघाला पाकिस्तानमध्ये जाण्याची परवानगी देणार नसल्याचे आतापर्यंत पाहायला मिळाले आहे.

### 29 वर्षानंतर पाकिस्तानला संधी

**१९९६ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेनंतर पाकिस्तानला पहिल्यांदा आयसीसीने आयोजनाची संधी दिली आहे. २००६ नंतर भारतीय संघाने पाकिस्तानचा दौरा केला नाही. दोन्ही देश एकमेकांविरुद्ध फक्त आयसीसीचे सामने खेळले आहेत. आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारत विरुद्ध पाकिस्तान असा सामना ९ जूनला होणार आहे.**

# दिल्लीचा पात्रतेचा मार्ग कठीण

## सहाव्या पराभवामुळे फटका : लखनऊ आज टॉप-3 मध्ये येऊ शकते

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**इंडियन प्रीमियर लीग (IPL) च्या 17 व्या हंगामात 47 सामने पूर्ण झाले आहेत. सोमवारी कोलकाता नाईट रायडर्सने दिल्ली कॅपिटल्सचा 7 गडी राखून पराभव केला. या निकालासह KKR दुसऱ्या स्थानावर कायम आहे. तर दिल्ली सहाव्या क्रमांकावर असली तरी प्ले ऑफमध्ये पोहोचण्याच्या त्यांच्या आशा मावळल्या आहेत.**




सोमवारी कोलकातामध्ये प्रथम फलंदाजी करताना दिल्ली कॅपिटल्सने 9 गडी गमावून 153 धावा केल्या. कोलकाताने 16.3 षटकांत 3 गडी गमावून लक्ष्य गाठले. दिल्लीचे आता 11 सामन्यांत 5 विजय आणि 6 पराभवातून 10 गुण झाले आहेत. या संघाला प्लेऑफसाठी पात्र होण्यासाठी शेवटचे 3 सामने जिंकावे लागतील.

कोलकाताचे 9 सामन्यांत 6 विजय आणि 3 पराभवांसह 12 गुण आहेत. संघाने दुसऱ्या स्थानावर आपले स्थान मजबूत केले आहे, त्यांचा धावगती देखील गुणतालिकेत सर्वोत्तम आहे.

आज मुंबई ७व्या क्रमांकावर येऊ शकते. या स्पर्धेत आज लखनऊच्या मैदानावर लखनऊ सुपरजायंट्सचा सामना मुंबई इंडियन्सशी होणार आहे. 5 वेळा चॅम्पियन मुंबईकडे 9 सामन्यांत केवळ 3 विजय आणि 6 पराभवांसह केवळ 6 गुण आहेत. संघ 9व्या क्रमांकावर आहे. लखनऊचा पराभव करून संघ 8 गुणांसह 7 व्या क्रमांकावर पोहोचेल. जर संघ मोठ्या फरकाने पराभूत झाला तर तो 10व्या स्थानावरही घसरू शकतो.

लखनऊला टॉप-3 मध्ये येण्याची संधी आहे. लखनौ सुपरजायंट्स 9 सामन्यांत 5 विजय आणि 4 पराभवांसह 10 गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. मुंबईचा पराभव करून संघ १२ गुणांसह तिसऱ्या स्थानावर पोहोचेल. तो पराभूत झाल्यास संघ पाचव्या स्थानावर राहील.

### फिल सॉल्ट तिसऱ्या स्थानावर!

CSK कर्णधार रुतुराज गायकवाडने या स्पर्धेत सर्वाधिक चौकार मारले आहेत, त्याच्या नावावर 9 सामन्यात 48 चौकार आहेत. केकेआरचा फिल सॉल्ट 44 चौकारांसह तिसऱ्या स्थानावर पोहोचला. आज एलएसजीचा केएल राहुल १५ चौकार मारून पहिल्या क्रमांकावर पोहोचू शकतो.

**बुमराहकडे जांभळ्या रंगाची टोपी**

एमआयचा जसप्रीत बुमराह 9 सामन्यात 14 विकेट्स घेऊन अव्वल स्थानावर आहे. सीएसकेचा मुस्तफिजुर रहमान आणि पीबीकेएसचा हर्षल पटेल यांच्याही विकेट्सची संख्या समान आहे. आज बुमराह आपली आघाडी मजबूत करू शकतो. विराटकडे अजूनही ऑरेंज कॅप आहे. आरसीबीचा विराट कोहली १७व्या मोसमात सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे, त्याच्याकडे ऑरेंज कॅप आहे. दिल्लीचा ऋषभ पंत ३९८ धावांसह चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. फिल सॉल्टनेही 392 धावांसह पाचव्या स्थानावर मजल मारली. आज केएल राहुल 123 धावा करून अव्वल स्थान गाठू शकतो.

**क्लासन हा सिक्सर किंग...**

एसआरएचचे हेनरिक क्लासेन आणि अभिषेक शर्मा स्पर्धेतील सहा हिटर्समध्ये टॉप-2 स्थानावर आहेत. क्लॉसेनच्या नावावर 28 तर अभिषेकच्या नावावर 27 षटकार आहेत. दिल्लीचा ऋषभ पंत 11 सामन्यात 24 षटकारांसह चौथ्या स्थानावर पोहोचला आहे.